सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/६७८ दिनांक : १२/०२/२०१८

**अत्यंत तातडीचे व कालमर्यादेचे**

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : वृक्ष लागवड आणि जिवंत रोपाची संख्या व टक्केवारीची माहिती.
संदर्भ क्र. :१. या विभागाचे विविमं/२०१६–१७/५८, दि. ०८/०७/२०१७ चे पत्र.
२. या विभागाचे विविमं/२०१७–१८/१४२, दि. २०/०७/२०१७ चे पत्र.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आपण दि. १ जुलै ते ७ जुलै २०१७ हया काळात वन महोत्सव उपक्रमात सहभागी झाला व उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार आपण केलेल्या वृक्षलागवडीची माहिती ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात आली होती. या लागवड केलेल्या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहण्याबाबत आपल्यास्तरावर योग्य ती काळजी घेण्याबाबत कळविण्यात आले होते. आणि संदर्भ क्र. २ नुसार वृक्ष लागवडीचा प्रत्यक्षदर्शी अहवाल, अंतिमत: संगोपन आणि जिवंत असलेल्या रोपाची संख्या व टक्केवारी यांचा त्रैमासिक अहवाल विहित प्रपत्रामध्ये पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

काही महाविद्यालय/संस्थांनी वृक्ष लागवडीची माहिती पाठवलेली आहे. परंतु वरीलप्रमाणे वृक्ष लागवड आणि जिवंत रोपाची संख्या व टक्केवारीचा त्रैमासिक अहवाल अशा दोन्ही प्रकारची माहिती अद्यापही बहुतांशी महाविद्यालय/संस्थांची प्राप्त झालेली नाही.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयात/संस्थेमध्ये दि. १ जुलै ते ७ जुलै २०१७ हया काळात केलेली वृक्ष लागवड आणि सद्यस्थितित जिवंत रोपाची संख्या व टक्केवारी अशा दोन्ही प्रकारची माहिती पुढील लिंकवर **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov/Institute joint scheme proposal Report– Tree Plantation Programe Report) दि. २०/०२/२०१८ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत** भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

सदर माहिती महाराष्ट्र शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने प्राधान्याने माहिती पाठविण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

(टीप : ज्या महाविद्यालय/संस्थांनी यापूर्वी वृक्ष लागवडीची माहिती भरलेली आहे. त्याच माहितीच्या आधारे जिवंत रोपाची संख्या व टक्केवारीची माहिती वरील लिंकवर ऑनलाईन पद्धतीने भरावी.)